# प्राचीन शिल्पकलेचा वारसा जपणारी वैशिष्ट्यपूर्ण स्त्री शिल्पे

**डॉ . संजय तुकाराम वाघमारे**
इतिहास विभाग प्रमुख
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
Email- drsanjaywaghmare7099@gmail.com
मो. नं.- ९३५९५९४८८०

**१ ) प्रास्ताविक :**

इतिहास संशोधनामध्ये विविध विषय येतात . या विषयामध्ये राजकिय , धार्मिक , सामाजिक व आर्थिक बाबींचा समावेश जास्त असतो . या प्रमाणेच सांस्कृतिक विषय ही महत्वाचे ठरतात . त्यामध्ये ही कलात्मक दृष्टीने झालेल्या प्रगतीला विशेष महत्व प्राप्त होते . कला व स्थापत्य हा अनेक जणांना आकर्षित करणारा विषय आहे . कलेमध्ये शिल्पकला व मंदिर बांधणीस प्राचीन काळात फारच वेग आला होता . त्याचे प्रत्यंत आजही गावोगावी असणा - या प्राचीन मंदीरावरून व इतस्ततः विखरून पडलेल्या शिल्पावरून येते . अशा शिल्पामध्ये बरीच विविधता असते . ही शिल्पे बहुतांशी एक संध मिळतात . तर कधी कधी खंडित स्वरूपात ही मिळतात . मात्र त्याचे कलात्मक महत्व मात्र अविनाशी असते . अशा शिल्पापैकी काही - काही मंदिरांच्या मंडोवरावर अर्थात बाह्यभिंतीवर जी स्त्री शिल्पे अथवा स्त्री प्रतिमा असतात त्यांची चर्चा या ठिकाणी केली आहे . अशा स्त्री शिल्पांना देवांगना किंवा सुरसुंदरी असे म्हटले जाते .

**२ ) शिल्पकलेची प्राचीन परंपरा** :

वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासानंतर या शिल्पशास्त्राचा अभ्यास अधिक डोळसपणे करता येतो . साहित्याचा एक भाग असाही आहे ज्यात शिल्प हाच प्रमुख विषय आहे . शिल्पांचे विवेचन करणारे अनेक प्राचीन ग्रंथ आहेत . त्यांची माहिती भारतीय मूर्तीशास्त्र या ग्रंथात मिळते . ( १ ) प्राचीन काळी शिल्पकला व शिल्पनिर्मिती यास फार महत्वाचे स्थान होते . विघे प्रमाणेच कला ही महत्वाची बाब समजली जाई . याबाबत प्राचीन विद्वान शुक्राचार्य यांनी म्हटले आहे की , विद्या ३२ प्रकारच्या असतात . कला ६४ प्रकारच्या असतात . भाषेद्वारे जी व्यक्त केली जाते ती विद्या व मुकपणे जी व्यक्त केली जाते ती कला विशेषतः शिल्पकला होय . (2)अशा शिल्पकलेमधून जी जी शिल्पे निर्माण झाली त्या पैकी मंदीरांच्या मंडोवरावरील स्त्री शिल्पे अर्थात सूरसुंदरी याबाबत येथे विचार मंथन केले आहे .

**३ ) प्राचीन मंदीर स्थापत्य :**

मंदिर व त्याची रचना ही सुरसुंदरीच्या दृष्टीने महत्वाची ठरते . म्हणून व त्यांचे स्थापत्य थोडक्यात पाहू . मंदिरांना देवालय असे म्हटले जाते . देवालय म्हणजे देवतेची मूर्ती किंवा प्रतीक बसवलेले असते ते स्थान देवालय शब्दाची , व्युत्पत्ती ही अशी आहे . देवस्य देवानां वा आल्य याचा अर्थ देवाचे किंवा देवांचे निवास स्थान असा होतो . देवालय किंवा

 Copyright © 2020 Authors

मंदिर हे केवळ देवाचे निबस स्थान नव्हे तर ते त्याचे शरिरच होय . याबाबत अग्नी पुराणात उल्लेख आहे तो असा एवमेष हरिः साक्षात् प्रसादत्वने संस्थितः अर्थ असा की अशा प्रकारे हा साक्षात श्रीहरीच प्रसाद ( मंदिर ) रूपाने अवस्थित आहे . हीच कल्पना पुढे वाढवून शरिराचे जसे भाग तसे देवालयाचे ही पडले . शिखर गर्भगृह मंडप , प्राकार , गोपुर , ध्वज इ . भाग तयार झाले . शिल्पशास्त्राच्या दृष्टीने देवालयाचे तीन प्रकार महत्वाचे मानले जातात . नागर , द्राविड व वेसर असे ते प्रकार होत . नागर हे चौकोनी , द्राविड हे अष्टकोनी तर वेसर हे गोलाकार पध्दतीचे मंदीर असते . अशा पध्दतीच्या प्राचीन मंदिरावर मात्र सर्व नव्हे काही मंदिरावर सुरसुंदरीचे अंकेन केले जाई . **४ ) सुरसुंदरी म्हणजे कोणती शिल्पे ? :**

सुरसुंदरी या प्राचीन मंदीरावर विशेषतः चाणक्य कालीन मंदीरावर बाह्य भिंतीवर दिसतात . मंदीराच्या वाह्य भिंतीवर शक्यतो उभ्या अवस्थेमध्ये स्त्रियांची जी शिल्पे कोरली गेली त्यांना सुरसुंदरी अप्सरा किंवा पन्या असे म्हटले गेले . मंदीरे ही आकर्षक बनविण्यासाठी त्यावर जे अनेक मुर्ती वा शिल्पाचे शिल्पांकन झाले त्यामध्ये सुरसुंदरी आल्या . मंदीर हे मोक्षप्राप्तीचे महत्वाचे साह्य असते आणि भक्ताला मोक्ष मिळणे सुलभ व्हावे म्हणून सुरसुंदरीचे अंकन मंदीराच्या बाह्य भिंतीवर करण्याचे तंत्र अवलंबले गेले . शिल्पप्रकाश या ग्रंथात १६ आणि क्षीरार्णव या ग्रंथात ३२ प्रकार या सुरसुंदरीचे सांगीतले आहेत . मंदीराला सुशोभित करणे ही कलाकारांची एक रीत होती . भारतीय मंदीरे ही हिंदुच्या जीवनाची आणि त्यांच्या विचारांची मुल्ये समजली जातात असे विचार लेखक कृष्णा देव यांनी मांडले आहेत . या भारतीय मंदीराचे स्थापत्य हे जागतिक पातळीवर महत्वाचे मानले जाते . कृष्णा देव पुढील शब्दात हिंदू मंदीराच्या स्थापत्याचे वेगळे पण सांगतात . The Hindu Temple succincty emobodies the basic values of Indian life and thousht . Its architectural form and dcor , invested with deep sumbolica / significance constitute a unique phenomenon in world Art . 37 pria froita मंदीर शैली किंवा स्थापत्य हे जगात कौतुकास पात्र ठरले आहे . कलाकारांनी मंदीरे वा त्यावरील शिल्पे घडवितांना मंदीरे ही सर्व हिंदुना अध्यात्मिक तपस्येसाठी आणि धार्मिक संस्कार जपण्यासाठी कशी उपयुक्त ठरतील याचा जास्त विचार केला . म्हणूनच मंदीरावरील शिल्पे निर्माण करतानाही त्यांनी हिंदूना त्यापासून कशी अध्यात्मिक प्रगती करता येईल व मोक्षप्राप्ती च्या मार्गावर कशी वाटचाल करता येईल . याचाच विचार केलेला दिसतो . नेमके हेच विचार अॅडम हार्डी या पाश्चात्य विचारवंताने पुढील शब्दात व्यक्त केले आहेत . But their purpose is often to provide a graded pattern for meditation , and they are also evoked in consecration or installation rituals for temples and for images . थोडक्यात असे की , या लेखकांना भारतीय मंदीरे जशी लक्षणिय वाटतात तशीच त्या मंदीरावरील शिल्पे ही महत्वाची वाटतात . मंदीर बांधत असतांना व शिल्पांचे अंकन करीत असतांना कलाकारांनी हिंदू जनतेला अध्यात्माच्या वाटेवर आणुन सोडले होते . मंदीरांच्या बाह्य भिंती वरील सुरसुंदरी ही स्त्री शिल्पे ही मानवास अध्यात्म व मोक्ष यासाठी प्रेरणा देत असतात . स्थापत्य हे जगात कौतुकास पात्र ठरले आहे . कलाकारांनी मंदीरे व त्यावरील शिल्पे घडविता । मंदीरे ही सर्व हिंदूना अध्यात्मिक तपस्येसाठी आणि धार्मिक संस्कार जपण्यासाठी कशी उपयुक्त ठरतील याचा जास्त विचार केला . म्हणूनच

मंदीरावरील शिल्पे निर्माण करतांनाही त्यांनी हिंदूना त्यापासून कशी अध्यात्मिक प्रगती करता येईल व मोक्षप्राप्ती च्या मार्गावर कशी वाटचाल करता येईल याचाच विचार केलेला दिसते नेमके हेच विचार अॅडम हार्डी या पाश्चात्य विचारवंताने पुढील शब्दात व्यक्त केले आहेत . “ But their purpose is often to provide a gnded pattern for meditation , and they are also evoked in consecration or installation rituals for temples and for images " . थोडक्यात असे की या लेखकांना भारतीय मंदीरे जशी लक्षणित वाटतात तशीच त्या मंदीरावरील शिल्पे ही महत्त्वाची वाटतात . मंदीर बांधत असतांना व शिल्पांचे अंकन करीत

 Copyright © 2020 Authors

असताना कलाकारांनी हिंदू जनतेला अध्यात्माच्या वाटेवर आणुन सोडले होते . मंदीरांच्या बाह्य भिंती वरील सुरसुंदरी ही स्त्री शिल्पे ही मानवास अध्यात्म व मोक्ष यासाठी प्रेरणा देत असतात .

**५ ) सुरसुंदरीद्वारे दिला जाणारा संदेश : -**

प्राचीन आणि मध्ययुगीन विशेषतः चालुक्य कालीन मंदीरावरील मंडोवरावर ज्या सुरसुंदरी अथवा कोरीव स्त्री शिल्पे असतात त्यांना त्याच्या उभे उभे रहाण्याच्या स्थितीवरून आभुषपणा वरून किंवा त्यांच्या हातात असलेल्या शस्त्रे , फुळे , पाने , पक्षी , प्राणी यांच्यावरून विशिष्ठ नावे पडली आहेत . तसेच त्या भक्तांना जो संदेश देतात त्यावरून ही नावे पडली आहेत . काही उदाहरणे पाहू या . कलाकारास व समाजास भावणारी एक सुरसुंदरी शुक सारिका ही होय . ही अत्यंत देखणी व कमनीय बांध्याची असते . तसेच नवयौवनाही असते . हिच्या एका हातात आम्रफलाची डहाळी व दुसऱ्या हातावर शुक अर्थात पोपट असतो . हा शुक अर्धवट पिकलेली आम्रफळे खाण्यासाठी या स्त्रीच्या हातावर वसतो . खरा पण तिचे अप्रतिम लावण्य पाहून शुक फळे खाण्याचे विसरून तिच्याकडे पहात रहातो . ही सुरसुंदरी असा संदेश देते को , निज कर्माच्या आड भक्तांनी कोणताही मोह वा लोभ येऊ देऊ नये . आणखी एक महत्वाची सुरसुंदरी सर्व मंदीराच्या बाह्य भिंतीवर शिल्पांकित केलेली असते . ती म्हणजे पुत्रवल्लभा इतर सुरसुंदरी पेक्षा थोडी वेगळी व प्रौढ असते . तिच्या कडेवर लहान बालक असते . या बालकाकडे ती अर्थपुर्ण व वात्सल्याने पहात उभी असते . ही सुरसुंदरी खुप देखणी आभुषणांनी सुशोभित व कमनीय असते . ही भक्तांना असा संदेश देत असते की , जसे नाते आई व बालक यांच्यात असते . तसेच ते भक्त व परमेश्वरामध्ये असावे . तु माझी माऊली । मी तुझे लेकरू । नको दुरू धरू । विठाबाई असे म्हणूनच संत नामदेव आपल्या अभंगात म्हणतात . फार भावस्पर्शी असे हे शिल्प असते . अशाच अनेक सुरसुंदरी मंदीराच्या वाह्य भिंतीवर असतात . उदा . डाल मालिका , नुपुरपादिका . पत्रलेखा , तोरणा , मर्दिनी , पुष्पगंधा , जया , डमरूवादिनी , विणावादिनी इ . अशा सुरसुंदरींनी प्राचीन मंदीरे शिल्पांकित होत असत

**निष्कर्ष :**

१ ) चालुक्य कालीन मंदीराच्या मंडोवरावर या सुरसुंदरी असतात .

२ ) प्रत्येक मंदीरावर अशी स्त्री शिल्पे आढळत नाहीत .

३ ) सुरसुंदरी म्हणजे देवांगना भक्तांना मंदीरात प्रवेश करण्यापूर्वी अध्यात्मिक संदेश देत असतात .

४ ) सुरसुंदरीची शिल्पे द्विपाद , त्रिपाद स्थितीत असतात .

५ ) सर्वच स्त्री शिल्पे देखणी व विलोभनिय असतात .

६ ) यांच्या केशरचना , वस्त्रे व आभुषणाद्वारे त्या - त्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करता येतो .

७ ) प्राचीन शिल्पकलेचा व कुशल शिल्पीचा एक सुंदर अविष्कार स्त्री शिल्पाद्वारे मंदीराच्या मंडोवरावर आजही दिसतो .

८ ) अशी स्त्री शिल्पे हा तरूण संशोधकासाठी संशोधनाचा विषय आहे .

 Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

**संदर्भ :**

१ ) भारतीय मूर्तिशास्त्र - लेखक - डॉ . नी . पु . जोशी निदेशक राज्य संग्रहालय . लखनऊ प्रकाशक अ . अं . कुलकर्णी नियंत्रक प्रकाशन समिती म . वि . ग्रं . नि . मंडळ पुणे -३०

२ ) भारतीय शिल्पसंहिता - पद्मश्री प्रभाशंकर ओ . सोमपुरा शिल्पविशारद , अहमदाबाद १३ , सौमच्या पब्लिकेशन प्रा . लि . बम्बई - नई दिल्ली इ . स . १ ९ ७५ पृष्ठ क्र .५

३ ) भारतीय संस्कृतिकोश चौथा खंड - संपादक पं . महादेवशास्त्री जोशी सहसंपादक तर्कतीर्थ सौ . पद्मजा होडारकर एम.ए. भारतीय संस्कृतिकोश मंडळ ४१० शनिवार पेठ पुणे ४११०३०

४ ) सुरसुंदरी ( मंदिरांच्या बाह्यांगावरील स्त्री - प्रतिमा ) डॉ . गो . बं . देगळूरकर भारतीय विद्याभवन , पुणे केंद्र पुणे ४११०१६ प्रकाशक प्रा . नंदकुमार काकिर्डे मानद सचिव भारतीय विद्याभवन , पुणे केंद्र इ . स . २००४ पृष्ठ १ ते ४

५ ) Temples of India Krishnadeva Vol . I : Text Aryan Books International New Delhi 2000 A. D. Page - Introduction

६ ) The Temple Architecture of India Adam Hardy - Bicentennial cong Wiley pool Wiley.Com . Page 36

७ ) सुरसुंदरीचे नाव कोरवली डॉ . सौ . लता अकलूजकर प्रकाशक प्रा . एस . मद्राल , सोलापूर मुद्रक ज्योती स्क्रिन साखरपेठ , सोलापूर ISBN ८५४-५३-८०३१ ५-५-८ इ . स . २०१३ पृष्ठ क्र . २५ ते २७

८ ) सुरसुंदरी ( मंदीरांच्या बाह्यांगावरील स्त्री प्रतिमा ) डॉ . गो . व . देगलुरकर भारतीय विद्याभवन पुणे केंद्र , पुणे ४११०१६ प्रकाशक प्रा . नंदकुमार कार्किड इ . स . २००४ पृष्ठ क्र . २७ , २८


Copyright © 2020 Authors